**Event Organization**

| Sr. No. | Event | Year | Level |
|---|---|---|---|
| 1 | Softball | 2022-2023 | Inter College |
| | Cycling | | Zonal Level |
| 2 | Softball | 2021-2022 | Inter College |
| | World Bicycle Day Ride | | Virtual level |
| | Tribute cycle Ride | | Virtual level |
| | Mission Olympic Pandharwada(15 Days Cycling, Walking | | Virtual level |
| 3 | 7 Days Republic Day Cycle Ride | 2020-21 | Virtual level |
| 4 | Hockey | 2019-20 | Inter College |
| 5 | Baseball | 2019-20 | Inter College |
| 6 | Baseball | 2015-2016 | Inter College |
| 7 | Kabaddi | 2015-2016 | Inter Zonal |
| 8 | Baseball | 2014-2015 | Inter College |
| 9 | Handball | 2013-2014 | Inter College |

**Events and Performance**

**List of Zonal Level players**

| **Sr.no** | **Year** | **Event** | **Name of Players Participated in Zonal level** | **Zonal Level tournament venue** |
|---|---|---|---|---|
| 1 | 2022-23 | Softball | Pavra Jyoti Kantilal | K.G Somaiya ,Kopargaon |
| | | | Pawara Durgadevi Kantilal | K.G Somaiya ,Kopargaon |
| | | | Borse Priyanka Mangaldas | K.G Somaiya ,Kopargaon |
| | | | Sonali Punamchand Purohit | K.G Somaiya ,Kopargaon |
| | | Volleyball | Sawant Aishawarya Sanjay | |
| | | Gymnastic | Poonam Kishor Ingale | CMCS,Karvenagar, Pune |
| | | | Sakshi Santosh Shinde | CMCS |
| | | Mallakhamb | Poonam Kishor Ingale | CMCS |
| | | | Maheswhari khairnar | CMCS,Karvenagar, Pune |
| | | Baseball | Pavra jyoti kantilal | BYK College Nashik |
| | | | Taralkar dhanashri vijay | BYK College Nashik |
| | | | Sonali punamchand purohit | BYK College Nashik |
| | | Yoga | Poonam Kishor Ingale | Malapani College, Sangamner |
| | 2021-2022 | Athletics | Harsha Sharad Deore | Bhosari ,Pune |
| | | | Jyoti K Pawara | Bhosari, Pune |
| | | Yoga | Poonam Kishor Ingale | Malapani College, Sangamner |
| | | Baseball | Harsha Sharad Deore | Malapani College, Sangamner |
| | | | Jyoti K Pawara | Malapani College, Sangamner |
| | | Hockey | Saloni Patil | |
| | | | Shital sonawane | |
| | | Softball | Radhika Vispute | |
| | | | Aishwarya Sawant | |
| | | | Harsha Sharad Deore | |
| | | | Jyoti K Pawara | |
| | 2019-2020 | Lawn Tennis | Rizwana Mohd.Zahoor | Lawn Tennis |
| | | Hockey | Pooja Shivaji More | Hockey |
| | | Hockey | Renuka Vijay More | Hockey |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Hockey | Anjali Prakash Bhill | Hockey |
| | | Hockey | Kalyani Suresh Bhadane | Hockey |
| | | Yoga | Nikita Manoj Jagtap | Yoga |
| | | Volleyball | Vidya S bhavsar | Volleyball |
| | | Judo | Aishwarya K Khambayat | Judo |
| | | Athletics | Vidya S Bhavsar | Athletics |
| | | Weight Lifting | Shraddha Nandu Pawar | Weight Lifting |
| | | Ball badminton | Dipali Arun Sumrao | Ball badminton |
| | | Ball-badminton | Gitanjali Vijay Shinde | Ball badminton |
| | | Handball | Dipali Arvind Shewale | Handball |
| | | Power Lifting | Shraddha Nandu Pawar | Power Lifting |
| | | Baseball | Sonali P Purohit | Baseball |
| | | Baseball | Vidya S Bhavsar | Baseball |
| | | Baseball | Vijaya Ramesh Gavit | Baseball |
| | | Baseball | Ashwini rajendra shillak | Baseball |
| | 2018-2019 | Lawn Tennis | Rizwana Mohd.Zahoor | Pune |
| | | Handball | Pooja Shivaji More | Junner ,Pune |
| | | Handball | Dipali Arvind Shewale | Junner ,Pune |
| | | Volleyball | Durgadevi K Pawara | Kopergaon |
| | | Athletics | Vidya S Bhavsar | Nashik |
| | | Hockey | Renuka Vijay More | Pimpri, Pune |
| | | Hockey | Anjali Prakash Bhill | Pimpri, Pune |
| | | Baseball | Durgadevi K Pawara | Sangamner |
| | | Baseball | Sonali P Purohit | Sangamner |
| | | Baseball | Vishakha M Golla | Sangamner |
| | | Baseball | Madhuri B Pawar | |
| | | Baseball | Vidya S Bhavsar | Sangamner |
| | | Softball | Durgadevi K Pawara | Laslgaon |
| | | Softball | Sonali P Purohit | Laslgaon |
| | | Softball | Madhuri B Pawar | Laslgaon |
| | 2017-2018 | Lawn Tennis | Rizwana Mohd.Zahoor | Pune |
| | | Handball | Nandini somnath shewale | Junner ,Pune |
| | | Volleyball | Manjusha A pagar | Pune |
| | | Volleyball | Aishwarya S Shinde | Pune |
| | | Athletics | Vidya S Bhavsar | Nashik |
| | | Hockey | Renuka Vijay More | Pimpri ,Pune |
| | | Hockey | Nandini somnath shewale | Pimpri ,Pune |
| | | Hockey | Ritu Dhondage | Pimpri ,Pune |
| | | Baseball | Manjusha A pagar | Baramati |
| | | Baseball | Aishwarya S Shinde | Baramati |
| | | Baseball | Durgadevi K Pawara | Baramati |
| | | Baseball | Savita G Bachhav | Baramati |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Baseball | Bhagyashri P Khare | Baramati |
| | | Baseball | Madhuri B Pawar | Baramati |
| | | Softball | Vidya S Bhavsar | Sangamner |
| | | Softball | Aishwarya S Shinde | Sangamner |
| | | Softball | Sonali P Purohit | Sangamner |
| | | Softball | Savita G Bachhav | Sangamner |
| | | Softball | Madhuri B Pawar | Sangamner |

**List of Meritorious Players**

| Sr No. | Year | Event | Name of the Players |
|---|---|---|---|
| 1 | 2008-2009 | Cricket | Malati Rajput |
| 2 | 2009-2010 | Korfball | Rashmi Tilwankar |
| 3 | 2010-2011 | Korfball | Mayuri Deshmukh |
| 4 | 2010-2011 | Softball | Madhuri Nandan |
| 5 | 2010-2011 | Baseball | Nazmin Qureshi |
| 6 | 2011-2012 | Cricket | Nazmin Qureshi |
| 7 | 2011-2012 | Cricket | Madhuri Nandan |
| 8 | 2011-2012 | Baseball | Madhuri Nandan |
| 9 | 2011-2012 | Softball | Malati Rajput |
| 10 | 2011-2012 | Netball | Sonali Wagh |
| 11 | 2011-2012 | Baseball | Malati Rajput |
| 12 | 2011-2012 | Baseball | Sonali Wagh |
| 13 | 2012-2013 | Softball | Nazmin Qureshi |
| 14 | 2012-2013 | Baseball | Mina Gaikwad |
| 15 | 2012-2013 | Netball | Pooja Dhumse |
| 16 | 2013-2014 | Baseball | Sonali Bachhav |
| 17 | 2013-2014 | Netball | Bhagyashri Khare |
| 18 | 2015-2016 | Baseball | Manjusha Pagar |
| 19 | 2016-2017 | Netball | Bhagyashri Prakash Shewale |
| 20 | 2016-2017 | Karate | Neha Satish Desai |
| 21 | 2017-2018 | Softball | Vidya Subhash Bhavsar |
| 22 | 2022-2023 | Softball | Sonali Punamchand Purohit |
| 23 | 2022-2023 | Yoga | Poonam Kishor Ingale- Rajastan |

News Gallery

10. News and events (last five years)

Gymkhana
20222-

नवराष्ट्र

# महिला महाविद्यालयात विजेत्या राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान

मालेगाव , (वा.) पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनी खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करून नैपुण्य प्राप्त केल्याबद्दल, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयीन आंतर विभागीय स्पर्धेतून निवड झालेल्या सोनाली पुरोहित या विद्यार्थिनीने १७ ते २१ मार्च २०२३ दरम्यान चंदीगड, पंजाब येथे पार पडलेल्या आंतरविद्यापीठीय स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या संघातून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

तसेच, ऑगस्ट २०२२ मध्ये श्रीरामपूर येथे आयोजित राज्यस्तरीय योगा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विजेती पूनम इंगळे या विद्यार्थिनीने २५ ते २८ मार्च २०२३ दरम्यान राजस्थान येथे



आयोजित ४७ व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय योगा स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला. सदर विद्यार्थिनींना क्रीडा संचालक डॉ. लहानु जाधव यांनी मार्गदर्शन केले.याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, प्राध्यापक बंधु-भगिनी, कार्यालयीन प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

Nashik Plus Edition
07 April 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com

नवभारत

## राज्य व राष्ट्रीय स्तर पर किया खेल का शानदार प्रदर्शन

# महिला खिलाड़ियों का हुआ सत्कार

■ मालेगांव (सं). पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय के खेल विभाग ने राज्य तथा राष्ट्रीय स्तर पर शानदार प्रदर्शन करने वाली महिला खिलाड़ियों का महाविद्यालय के प्रभारी प्राचार्य मृणाल भारद्वाज के हाथों सत्कार किया गया. महाविद्यालयीन अंतरविभागीय स्पर्धा के माध्यम से चुनी गई सोनाली पुरोहित नामक छात्रा ने 17 से 21 मार्च की कालावधि में चंडीगढ़ (पंजाब) में आयोजित की गई अंतरविश्वविद्यालय स्पर्धा में सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ की टीम का प्रतिनिधित्व किया.

श्रीरामपुर में अगस्त 2022 में आयोजित



की गई राज्यस्तरीय योगा स्पर्धा में पहला स्थान प्राप्त करने वाली पूनम इंगले ने 25 से 28 मार्च की कालावधि में राजस्थान में आयोजित 47वीं वरिष्ठ महिला राष्ट्रीय योगा स्पर्धा में चौथा स्थान प्राप्त किया. इन विद्यार्थियों का खेल विभाग के संचालक डॉ. लहानु जाधव ने मार्गदर्शन किया. कार्यक्रम में महाविद्यालय के उप प्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी तथा अन्य छात्राएं उपस्थित थी.

Nasik Edition
07-april-2023 Page No. 7
epaper.enavabharat.com

## थोडक्यात...



# सोनाली-पूनमचे क्रीडा स्पर्धेत यश

**मालेगाव ।** येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या सोनाली पुरोहित व पूनम इंगळे या विद्यार्थिनींनी क्रिडा स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करून यश संपादन केल्याबद्दल त्यांचा प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या हस्ते सत्कार करण्यात येवून गौरव केला गेला. महाविद्यालयीन आंतर विभागीय स्पर्धेतून निवड झालेल्या सोनाली पुरोहित या विद्यार्थिनीने चंदीगड येथे पार पडलेल्या आंतरविद्यापीठीय स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुलींच्या संघातून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. तसेच श्रीरामपूर येथे आयोजित राज्यस्तरीय योगा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विजेती पूनम इंगळे या विद्यार्थिनीने राजस्थान येथे आयोजित ४७ व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय योगा स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला आहे. क्रीडा संचालक डॉ. लहानु जाधव यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान



मालेगाव कॅम्प – महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या सोनाली पुरोहित व पूनम इंगळे या विद्यार्थिनी खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करून नैपुण्य प्राप्त केल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या हस्ते दिनांक ३ एप्रिल रोजी यथोचित सत्कार करण्यात आला.

सदर खेळाडूंचे यश हे महाविद्यालयाचा लौकिक वाढविणारे असल्याने त्यांच्या बहुमोल कामगिरीसाठी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या उपाध्यक्ष डॉ. संपदा हिरे यांनी अभिनंदन केले.

महाविद्यालयीन आंतर विभागीय स्पर्धेतून निवड झालेल्या सोनाली पुरोहित या विद्यार्थिनीने १७ ते २१ मार्च दरम्यान चंदीगड, पंजाब येथे पार पडलेल्या आंतरविद्यापीठीय स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या संघातून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. तसेच, ऑगस्ट २०२२ मध्ये श्रीरामपूर येथे आयोजित राज्य स्तरीय योगा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विजेती पूनम इंगळे या विद्यार्थिनीने २५ ते २८ मार्च २०२३ दरम्यान राजस्थान येथे आयोजित ४७ व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय योगा स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला.

सदर विद्यार्थिनींना क्रीडा संचालक डॉ. लहानु जाधव यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, प्राध्यापक बंधु–भगिनी, कार्यालयीन प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उप–स्थित होते.

---

सकाळ



**मालेगाव शहर : पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय खेळाडू सोनाली पुरोहित हिचा सत्कार करताना डॉ. मृणाल भारद्वाज. शेजारी डॉ. दीपांजली बोरसे.**

# खेळाडूंचा महाविद्यालयातर्फे सत्कार

**मालेगाव शहर, ता. ४ :** येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयातील खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करून नैपुण्य प्राप्त केल्याबद्दल सोनाली पुरोहित व पुनम इंगळे या दोन्ही खेळाडूंचा प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयीन अंतर विभागीय स्पर्धेतून निवड झालेल्या सोनाली पुरोहित या विद्यार्थिनीने १७ ते २१ मार्च २०२३ दरम्यान चंडीगड, पंजाब येथे पार पडलेल्या आंतरविद्यापीठीय स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या संघातून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. श्रीरामपूर येथे आयोजित राज्यस्तरीय योगा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विजेती पूनम इंगळे या विद्यार्थिनीने राजस्थान येथे आयोजित ४७ व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय योगा स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थिनींना क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के उपस्थित होते.

Nashik, Malegaon
05/04/2023 Page No. 4

## महिलांच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनीची निवड

मालेगाव कॅम्प – महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सोनाली पूनमचंद पुरोहित हिची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महिलांच्या सॉफ्टबॉल संघामध्ये पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे १७ मार्च २०२३ ते २९ मार्च २०२३ दरम्यान आयोजित महिलांच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल स्पर्धेत खेळण्या साठी निवड झाली आहे.

सदर विद्यार्थिनीस, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांत हिरे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे, युवानेते डॉ. अद्वयआबा हिरे–पाटील, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के व महाविद्यालयीन परिवाराने शुभेच्छा दिल्या



आहेत. सदर खेळाडूला महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ.लहानू जाधव यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.



# महिला महाविद्यालयात महिला दिनानिमित्त आयोजित वॉकथॉन स्पर्धेला उत्साह



मालेगाव : पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय क्रीडा विभाग व हॉटेल मेल्योर यांच्या सौजन्याने महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या मार्गदर्शनात जागतिक महिला दिनानिमित्त दि. ९ मार्च रोजी ३ किमी व ५ किमी वॉकथॉन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. स्पर्धे त मालेगावकर महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी सर्व महिला स्पर्धकांना पदक, प्रमाणपत्र, गुलाब पुष्प तसेच सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत ३० ते ३५ वयोगटात धनश्री गुंजाळ , चित्रा सावळे व ममता भावनिक यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.४१ ते ४५ वयोगटात प्रथम- निशा नितीन निकम, द्वितीय -आरती गौतम साकला व तृतीय - शालिनी निकम यांनी पारितोषिक प्राप्त केले. ४५-५५ वयोगटात प्रथम क्रमांक - अलका पाटील ,द्वितीय क्रमांक- संजना पवार, तृतीय क्रमांक - दिपाली साकला यांनी प्राप्त केला तर ५६ पुढील वयोगटात प्रथम क्रमांक - उन्नती पवार ,द्वितीय क्रमांक - सुवर्णा कापडणीस तृतीय क्रमांक - डॉ. प्रेमल देवरे यांना मिळाला. या स्पर्धे त एकूण ३० महिलांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे यांच्या हस्ते झेंडा दर्शवून स्पर्धेस सुरुवात झाली. सकाळी ६ वाजता महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर सदर स्पर्धा पार पडल्या. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मीना पाटील यांनी पदक व प्रमाणपत्र वितरणा- चे कार्य सांभाळले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. शिल्पा यन्ना- वार यांनी नाव नोंदणी, स्पर्धेची प्रसिद्धी याबाबत विशेष कामगिरी बजावली.या स्पर्धेसाठी पंच म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्रा.संकेत वाबळे , श्री संजय जोशी यांचे सहकार्य लाभले.याप्रसंगी शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के उपस्थित होत्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींच्या मदतीने स्पर्धेचे नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

# महिला महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त सायक्लोथॉन स्पर्धा उत्साहात

**मालेगाव ।** पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय क्रीडा विभाग व हॉटेल मेल्योर यांच्या सौजन्याने जागतिक महिला दिनानिमित्त दि. १० मार्च २०२३ रोजी सायक्लोथॉन स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेची सुरुवात महाविद्यालयाच्या गेटपासून झाली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.तेजस्विनी सोनटक्के यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले.या सायकल स्पर्धेचा मार्ग हा रावळगाव नाका - चर्च तसेच नामपूर रोड भवानी मंदिर व परत महिला महाविद्यालय असा होता. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन गटासाठी १५ किमी तसेच महिला गटासाठी २० किमी असे अंतर ठेवण्यात आले होते. २० किमी अंतर महिला गटात प्रथम क्रमांक - वैशाली शेलार, द्वितीय क्रमांक - जयश्री शेलार व तृतीय क्रमांक - पल्लवी आहेर यांनी पटकावला तर १५ किमी अंतर महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक - दिव्या मोरे, द्वितीय क्रमांक - पूनम चव्हाण तसेच तृतीय क्रमांक - पल्लवी मोरे यांनी प्राप्त केला. या सायकल स्पर्धेमध्ये एकूण १९ महिलांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धेसाठी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे, युवानेते डॉ. अद्वयआबा हिरे- पाटील,प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे यांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींच्या मदतीसह स्पर्धेचे नियोजन केले व परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त सायक्लोथॉन स्पर्धा संपन्न



मालेगाव कॅम्प-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय क्रीडा विभाग व हॉटेल मेल्योर यांच्या सौजन्याने जागतिक महिला दिनानिमित्त दि.१० मार्च २०२३ रोजी सायक्लोथॉन स्पर्धा संपन्न झाली.

या स्पर्धेची सुरुवात महाविद्यालयाच्या गेटपासून झाली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले. या सायकल स्पर्धेचा मार्ग हा रावळगाव नाका-चर्च तसेच नामपूर रोड भवानी मंदिर व परत महिला महाविद्यालय असा होता.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन गटासाठी १५ किमी तसेच महिला गटासाठी २० किमी असे अंतर ठेवण्यात आले होते. २० किमी अंतर महिला गटात प्रथम क्रमांक – वैशाली शेलार, द्वितीय क्रमांक – जयश्री शेलार व तृतीय क्रमांक-पल्लवी आहेर यांनी पटकावला तर १५ किमी अंतर महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक-दिव्या मोरे, द्वितीय क्रमांक-पूनम चव्हाण तसेच तृतीय क्रमांक – पल्लवी मोरे यांनी प्राप्त केला. या सायकल स्पर्धेमध्ये एकूण १९ महिलांनी सहभाग घेतला.

सदर स्पर्धेसाठी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे, युवानेते डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील,प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे यांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींच्या मदतीसह स्पर्धेचे नियोजन केले व परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात महिला दिनानिमित्त वॉकथॉन स्पर्धा संपन्न



मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय क्रीडा विभाग व हॉटेल मेल्योर यांच्या सौजन्याने महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांच्या मार्गदर्शनात जागतिक महिला दिनानिमित्त दि.९ मार्च २०२३ रोजी ३ किमी व ५ किमी वॉकथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धेचे आयोजन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले.

या स्पर्धेत मालेगावकर महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी सर्व महिला स्पर्धकांना पदक, प्रमाण पत्र, गुलाब पुष्प तसेच सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत ३० ते ३५ वयो गटात धनश्री गुंजाळ , चित्रा सावळे व ममता भावनिक यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. ४१ ते ४५ वयोगटात प्रथम- निशा नितीन निकम, द्वितीय -आरती गौतम साकला व तृतीय - शालिनी निकम यांनी पारितोषिक प्राप्त केले.

४५-५५ वयोगटात प्रथम क्रमांक - अलका पाटील, द्वितीय क्रमांक- संजना पवार, तृतीय क्रमांक-दिपाली साकला यांनी प्राप्त केला तर ५६ पुढील वयोगटात प्रथम क्रमांक - उन्नती पवार, द्वितीय क्रमांक-सुवर्णा कापडणीस तृतीय क्रमांक-डॉ. प्रेमल देवरे यांना मिळाला. या स्पर्धेत एकूण ३० महिलांनी सहभाग नोंदवला.

महाविद्यालयाच्या उप प्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे यांच्या हस्ते झेंडा दर्शवून स्पर्धेस सुरुवात झाली. सकाळी ६ वा. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर सदर स्पर्धा पार पडल्या.

अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मीना पाटील यांनी पदक व प्रमाणपत्र वितरणाचे कार्य सांभाळले. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. शिल्पा यन्नावार यांनी नाव नोंदणी, स्पर्धेची प्रसिद्धी याबाबत विशेष कामगिरी बजावली. या स्पर्धेसाठी पंच म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्रा.संकेत वाबळे, श्री संजय जोशी यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के उपस्थित होत्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींच्या मदतीने स्पर्धेचे नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात योग दिन साजरा



मालेगाव कॅम्प – महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक मा. डॉक्टर अपूर्व हिरे व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त तसेच महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष मा. संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून व आय.क्यू.ए.सी., क्रीडा विभाग , राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या सहयोगाने २१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

सदर योग दिनाचे औचित्य साधून १५ जून २०२२ ते २१ जून २०२२ दरम्यान सात दिवसीय आभासी पद्धतीने योगशिबिर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले व दिनांक २१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करून समारोप करण्यात आला.

सात दिवसीय सप्ता–हा मध्ये आभासी स्तरा–वर आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार विविध आसने, प्राणायाम करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कु. पुनम इंगळे (प्रथम वर्ष विज्ञान) व माहेश्वरी खैरनार (प्रथम वर्ष कला) यांनी योग सप्ताहात योगशिक्षक म्हणून प्रात्यक्षिके करत मार्गदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारताचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाचा सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनींनी लाभ घेतला.

शिबिराच्या समारोप प्रसंगी आयुर्वेदाचार्य डॉ. योगिता खैरनार (निर्मलसाई क्लिनिक व आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालय, मालेगाव) यांनी योग दिन साजरा करण्यामागील महत्व व वेगवेगळ्या योगासनांची प्रात्यक्षिके करून प्रत्येक योगासनाचे महत्त्व पटवून दिले.

या प्रसंगी महा विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्ज्वला एस. देवरे यांनी अध्यक्षीय मनो–गतातून शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्व विशद करून, योग ही भारतीय प्राचीन विद्यांपैकी असलेली बहुमोल अशी विद्या असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. जी. जाधव, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी.ए. पवार, सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. लहानु जाधव व महिला तक्रार निवारण समिती समन्वयक डॉ. मीना पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक स्पर्धेत यश



मालेगाव कॅम्प – महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी खेळाडूंची दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी कर्वेनगर, पुणे येथे होणाऱ्या मुलींच्या आंतरविभागीय रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी निवड झाली.

सदर स्पर्धा सिडको महाविद्यालय व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ नोव्हेंबर २०२२ रोजी यशवंत व्यायामशाळा, नाशिक येथे पार पडल्या. यामध्ये रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकारांत विद्यार्थिनी खेळाडूंनी रोप मल्लखांबवर वैयक्तिक संचात स्टँडल एल होल्ड, रिकेब , क्रॉस , बजरंग ई. कौशल्यांचे सादरीकरण केले. तसेच आर्टीस्टिक जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकारामध्येही फ्लोअर एक्सरसाईज सादर केले.

या क्रीडा स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या कु. पूनम इंगळे एसवायबीएस्सी, कु. माहेश्वरी खैरनार एसवायबीए, कु. साक्षी शिंदे एसवायबीएस्सी यांची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, कर्मवीर भाऊसाहेब हिरे ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष संपदा हिरे, युवानेते डॉ अद्वयआबा हिरे पाटील, प्राचार्य डॉ. उज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के व महाविद्यालयीन परिवाराने खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यास्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव व प्रा. किरण पवार (मल्लखांब राष्ट्रीय खेळाडू) यांचे मार्गदर्शन लाभले.

# पुष्पाताई हिरे महिला कॉलेजचे मल्लखांब व जिम्नॅस्टीक स्पर्धेत यश



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी खेळाडूंची दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी कर्वेनगर, पुणे येथे होणाऱ्या मुलींच्या आंतरविभागीय रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सदर स्पर्धा सिडको महाविद्यालय व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ नोव्हेंबर २०२२ रोजी यशवंत व्यायामशाळा, नाशिक येथे पार पडल्या.

यामध्ये रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकारांत विद्यार्थिनी खेळाडूंनी रोप मल्लखांबवर वैयक्तिक संचात स्टँडल एल होल्ड, रिकेब, क्रॉस, बजरंग ई. कौशल्यांचे सादरीकरण केले. तसेच आर्टीस्टिक जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकारामध्येही फ्लोअर एक्सरसाईज सादर केले.

या क्रीडा स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या कु.पूनम इंगळे एसवायबीएस्सी, कु.माहेश्वरी खैरनार एसवायबीए, कु. साक्षी शिंदे एसवायबीएस्सी यांची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दिव्य मराठी नाशिक' जिल्हा पुलआउट 09-11-2022

# हिरे महिला कॉलेजच्या खेळाडूंची रोप मलखांब व जिम्नॅस्टिकसाठी निवड

प्रतिनिधी | मालेगाव



महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी खेळाडूंची दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी कर्वेनगर, पुणे येथे होणाऱ्या मुलींच्या आंतरविभागीय रोप मलखांब व जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सिडको महाविद्यालय व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या वतीने दि. ५ नोव्हेंबर रोजी यशवंत व्यायामशाळा, नाशिक येथे झालेल्या रोप मलखांब व जिम्नॅस्टिक या क्रीडाप्रकारांत हिरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी खेळाडूंनी रोप मलखांबवर वैयक्तिक संचात स्टँडल एल होल्ड, रिकेब, क्रॉस, बजरंग आदी कौशल्यांचे सादरीकरण केले. आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकारामध्येही फ्लोअर एक्सरसाईज सादर केले. या क्रीडा स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या पूनम इंगळे, माहेश्वरी खैरनार, साक्षी शिंदे यांची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के व महाविद्यालयीन परिवाराने खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव व प्रा. किरण पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ



मालेगाव : सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळविलेला पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाचा संघ.

# पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या संघाला सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद

**सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव, ता. ३० : येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय व नाशिक जिल्हा क्रीडा समितीतर्फे केबीएच विद्यालयाच्या क्रीडांगणावर मुलींच्या आंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्‍घाटन दामिनी पथकाच्या उपनिरीक्षक वर्षा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाने विजेतेपद मिळविले.

या स्पर्धेमध्ये एचपीटी महाविद्यालय, केटीएचएम महाविद्यालय, नामपूर महाविद्यालय, लासलगाव महाविद्यालय, एनबीटी लॉ महाविद्यालय, येवला महाविद्यालय, केबीएच निमगाव महाविद्यालय, भोसला महाविद्यालय, मसगा महाविद्यालय अशा एकूण बारा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत संघ व्यवस्थापक व क्रीडा संचालक म्हणून प्रा. नारायण जाधव, प्रा. प्रदीप वाघमारे, प्रा. तेजस कुलकर्णी, प्रा. मनीष देवरे उपस्थित होते. प्रा. तेजस कुलकर्णी, प्रा. गणेश जाधव व विकी केदारे यांनी पंच म्हणून कार्य केले. अंतिम सामना हा लासलगाव महाविद्यालय विरुद्ध महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या संघामध्ये चुरशीचा होऊन या सामन्यात महिला महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेतून महिला महाविद्यालयाच्या ज्योती पावरा, सोनाली पुरोहित, दुर्गा पावरा, प्रियांका बोरसे, धनश्री तरळकर व रोहिणी निकम या खेळाडूंची आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षण मंडळाच्या चेअरमन प्रा. सुरेखा दप्तरे व सदस्य प्रा. दिनेश कराड उपस्थित होते. निवड समितीमध्ये प्रा. नारायण जाधव (लासलगाव महाविद्यालय), प्रा. तेजस कुलकर्णी (एचपीटी महाविद्यालय) व प्रा. लहानु जाधव (महिलारत्न महिला महाविद्यालय) यांनी स्पर्धेतील अंतिम निवडलेला संघ हा आंतरविभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी नाशिककडून प्रतिनिधीत्व करणार आहे. नाशिक जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे उपसचिव प्रा. नरेंद्र निकम (ग्रामीण विभाग) यांच्या उपस्थितीत स्पर्धा पार पडल्या. क्रीडा संचालक प्रा. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या 'कमवा व शिका' योजनेच्या विद्यार्थिनींच्या मदतीसह परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली. यशस्वी खेळाडूंचे अनेकांनी अभिनंदन केले.

Nashik, Malegaon
01/12/2022 Page No. 4

**सकाळ**

# हिरे महिला महाविद्यालयात रंगल्या सॉफ्टबॉल स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**



**मालेगाव : पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात जिल्हास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना पोलिस निरीक्षक वर्षा पाटील, प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे.**

मालेगाव शहर, ता. ११ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय व नाशिक जिल्हा क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या आंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेचे उदघाटन दामिनी पथकातील पोलीस निरीक्षक वर्षा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये एचपीटी महाविद्यालय, केटीएचएम महाविद्यालय, नामपूर महाविद्यालय, लासलगाव महाविद्यालय, एनबीटी लॉ महाविद्यालय, येवला महाविद्यालय, केबीएच निमगाव महाविद्यालय, भोसला महाविद्यालय,मसगा महाविद्यालय अशा बारा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत संघ व्यवस्थापक व क्रीडा संचालक म्हणून डॉ. नारायण जाधव, प्रा. प्रदीप वाघमारे, प्रा. तेजस कुलकर्णी, डॉ. मनीष देवरे उपस्थित होते. पंच म्हणून प्रा. तेजस कुलकर्णी, प्रा. गणेश जाधव व विकी केदारे यांनी पंच म्हणून कार्य केले.

सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे चेअरमन डॉ. सुरेखा दप्तरे व सदस्य डॉ. दिनेश कराड प्रमुख पाहुणे उपस्थित होते. या स्पर्धेत निवड समितीमध्ये डॉ नारायण जाधव, प्रा. तेजस कुलकर्णी, डॉ. लहानु जाधव यांनी स्पर्धेतील संघाची निवड करून या स्पर्धेत अंतिम निवडलेला संघ हा आंतरविभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी नाशिककडून प्रतिनिधीत्व करणार आहे. स्पर्धेसाठी नाशिक जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे उपसचिव डॉ. नरेंद्र निकम यांच्या उपस्थितीत स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत अंतिम सामना हा लासलगाव महाविद्यालय विरुद्ध पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या संघामध्ये चुरशीचा सामना होत महिला महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेतून महिला महाविद्यालयाच्या ज्योती पावरा ,सोनाली पुरोहित, दुर्गा पावरा, प्रियांका बोरसे, धनश्री तरळकर व रोहिणी निकम या खेळाडूंची निवड आंतर विभागीय स्पर्धेसाठी झाली.

या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, संपदा हिरे, डॉ. अद्वय हिरे , प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांनी कौतुक केले. स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी परिश्रम घेतले.

Nashik, Malegaon
12/12/2022 Page No. 3

**सकाळ**

# तंदुरुस्तीसाठी सायकलिंग महत्त्वाचे : सुतकर

## महिला महाविद्यालयात विभागीय स्पर्धेचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता. ३ : आज सर्वत्र धावपळ सुरू आहे. तंत्रज्ञानाच्या युगात आपण वावरतोय. बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामाची गरज असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जाते. तंदुरुस्त जगण्यासाठी सायकलींग अतिशय महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय उपप्रबंधक अमितकुमार सुतकर यांनी येथे केले.

येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, बँक ऑफ महाराष्ट्र आणि स्मायली सायकलिंग डेव्हलपमेंट अकादमी यांच्यातर्फे होत असलेल्या दोन दिवसीय विभागीय सायकलिंग (मुले-मुली) स्पर्धेचे उद्घाटन श्री. सुतकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे अध्यक्षस्थानी होत्या. बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रशासकीय अधिकारी संग्राम शहा, विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. विक्रम फाले, प्रा. रतन गांगुर्डे, उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे आदी प्रमुख पाहुणे होते. श्री. सुतकर म्हणाले की, सध्या सर्वत्र स्पर्धा आहे. तंदुरुस्त जगण्यासाठी सायकलींग नियमित करावी.

महामार्गावर टेहरे ते बाबा ढाबा या दहा किलोमिटर मार्गावर ही स्पर्धा झाली. अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्यासह ग्रामीण व छावणी पोलिस, वाहतूक शाखेचे सहकार्य लाभले. पहाटे सहाला पोलीस उपनिरीक्षक मोहित मोरे यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन झाले. मुलांसाठी चाळीस कि.मी. अंतर वैयक्तिक टाईम ट्रायल व मुलींसाठी वैयक्तिक टाईम ट्रायल वीस कि. मी. अंतराची स्पर्धा झाली. सायकलिंग रोड रेस निवड समितीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. शांताराम ढमाले, डॉ. लहानू जाधव व प्रा. नामदेव बने यांनी या निवड प्रक्रियेचे कामकाज पाहिले. पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर जिल्हा व नाशिक जिल्हा या चार विभागातून २४ मुले व १९ मुली अशा ३९ खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.



**मालेगाव : विभागीय सायकलिंग स्पर्धेच्या उद्घाटनावेळी बोलताना बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय उपप्रबंधक अमितकुमार सुतकर. शेजारी प्रशासकीय अधिकारी संग्राम शहा, प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे.**

कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवकाची भूमिका बजावली. क्रीडा समितीचे उपसचिव डॉ. नरेंद्र निकम, प्रा. किरण पवार व डॉ. मनीष देवरे, कैलास अहिरे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांनी सहकार्य केले. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव यांनी क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींच्या मदतीने संयोजन केले.

Nashik, Malegaon
04/01/2023 Page No. 4

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाचा रस्ता सुरक्षा हेल्मेट रॅलीत सक्रिय सहभाग



**मालेगाव कॅम्प - उपप्रादेशिक परिवहन विभागाद्वारे दि. ६ जानेवारी २०२३ रोजी रस्ता सुरक्षा व जीवनरक्षा अभियानांतर्गत महिला व तरुणींमध्ये हेल्मेट जागृती तसेच दुचाकी चालविण्यासाठी प्रबोधन कार्यक्रम व रॅलीचे आयोजन करण्यात आले. या अभियानात महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयाने सहभाग घेतला.**

उपप्रादेशिक वाहतूक अधिकारी मा.विनोद जाधव यांनी रॅलीपूर्वी मार्गदर्शन केले की, वारंवार आवाहन करूनही लोक स्वसंरक्षणासाठी हेल्मेट वापरत नसल्याने प्रादेशिक परिवहन विभागाने सक्तीने तरुणाईच्या व मालेगावकरांच्या डोक्यावर हेल्मेट चढविण्याचा निर्णय घेतला आहे. हेल्मेट है जरूरी, ना समझो इसे मजबूरीफ हा संदेश सर्वत्र पोचवणार. मोटरसायकल चालक हेल्मेट वापराबाबत प्रचंड उदासिन आहेत. अपघातात सर्वाधिक बळी हेल्मेट अभावीच जात असल्याचे त्यांनी सांगितले.

उपप्रादेशिक परिवहन विभागाचे मा. श्री सचिन बोधले (मोटर वाहन निरीक्षक) यांच्या निरीक्षणात या मोहिमेचे किनारा हॉटेल- गिरणा पूल- मोसम पूल- शिवाजी पुतळा-एकात्मता चौक- केबीएच विद्यालय- तहसील कार्यालय - सटाणा नाका पुन्हा मोसम पूल- मोतीबाग नाका- गिरणा पूल व संपूर्ण मालेगाव शहरात रॅली काढण्यात आली. या दरम्यान हेल्मेटचा वापर, जागृत नागरिकाचे लक्षण, मोबाईल साधा जरी असला तरी त्याला कव्हर, मग डोक्यालाही हेल्मेट का नको बरं , हेल्मेट है जरुरी,ना समजो इसे मजबुरी अशा घोषणा देण्यात आल्या.

दुचाकी रॅलीसमवेत महिला पोलिस अधिकारी गायत्री प्रभाकर चव्हाण (सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक), सुवर्णा देवरे (सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक) तसेच प्रियंका मोकळ, हर्षाली आव्हाड व पूनम पवार तसेच महिला महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ.लहानु जाधव, डॉ. प्रेमल देवरे, महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सलोनी पाटील, भाग्यश्री बोरसे, निकिता बोरसे यांनी या संपूर्ण मोहिमेत दुचाकी चालवत सक्रिय सहभाग नोंदवला.

या मोहिमेतील सहभागासाठी कर्मवीर भाऊसाहेब हिरे ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष संपदा हिरे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ.मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ.दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांनी परिवहन अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून विद्यार्थिनी व प्राध्यापकांना मोहिमेत सहभागासाठी प्रेरित केले.

सकाळ

# हिरे महिला महाविद्यालयाचा रस्ता सुरक्षा हेल्मेट रॅलीत सहभाग

**मालेगाव शहर, ता.७ :** येथील उपप्रादेशिक परिवहन विभागातर्फे रस्ता सुरक्षा व जीवनरक्षा अभियानांतर्गत महिला व तरुणींमध्ये हेल्मेट जागृती दुचाकी चालविण्यासाठी प्रबोधन कार्यक्रम व रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या अभियानात पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यल्याने सहभाग घेतला. यावेळी उपप्रादेशिक वाहतूक अधिकारी विनोद जाधव, मोटार वाहन निरीक्षक सचिन बोधले, सहाय्यक निरीक्षक गायत्री चव्हाण, सुवर्णा देवरे आदी उपस्थित होते. श्री. जाधव मार्गदर्शन करताना म्हणाले, की वारंवार आवाहन करूनही लोक हेल्मेट वापरत नसल्याने प्रादेशिक परिवहन विभागाने सक्तीने तरुणाईच्या व मालेगावकरांच्या डोक्यावर हेल्मेट चढविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या पुढे 'हेल्मेट है जरूरी, ना समझो इसे मजबूरी' हा संदेश सर्वत्र पोचवणार. मोटरसायकल चालक हेल्मेट वापराबाबत प्रचंड उदासीन आहेत. अपघातात सर्वाधिक बळी हेल्मेट अभावीच जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. यादरम्यान हेल्मेटचा वापर,जागृत नागरिकाचे लक्षण मोबाईल साधा जरी असला असते त्याला कव्हर, मग डोक्यालाही हेल्मेट का नको बरं" हेल्मेट है जरुरी,ना समजो इसे मजबुरी अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी महिला पोलिस अधिकारी प्रियांका मोकळ , हर्षाली आव्हाड व पूनम पवार तसेच महिला महाविद्यालय क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव, डॉ. प्रेमल देवरे विद्यार्थिनी सलोनी पाटील, यांनी या संपूर्ण मोहिमेत दुचाकी चालवत सक्रिय सहभाग नोंदवला.

Nashik, Malegaon
08/01/2023 Page No. 2

# पुष्पाताई हिरे महिला कॉलेजात योग दिन साजरा



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉक्टर अपूर्व हिरे व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त तसेच महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून व आय. क्यू.ए.सी., क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या सहयोगाने २१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. सदर योग दिनाचे औचित्य साधून १५ जून २०२२ ते २१ जून २०२२ दरम्यान सात दिवसीय आभासी पद्धतीने योगशिबिर सप्ता हाचे आयोजन करण्यात आले व दिनांक २१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करून समारोप करण्यात आला. सात दिवसीय सप्ताहामध्ये आभासी स्तरावर आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार विविध आसने, प्राणायाम करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कु. पुनम इंगळे (प्रथम वर्ष विज्ञान) व माहेश्वरी खैरनार (प्रथम वर्ष कला) यांनी योग सप्ताहात योगशिक्षक म्हणून प्रात्यक्षिके करत मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाचा सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनींनी लाभ घेतला. शिबिराच्या समारोप प्रसंगी आयुर्वेदाचार्य डॉ. योगिता खैरनार (निर्मलसाई क्लिनिक व आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालय, मालेगाव) यांनी योग दिन साजरा करण्यामागील महत्व व वेगवेगळ्या योगासनांची प्रात्यक्षिके करून प्रत्येक योगासनाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्ज्वला एस. देवरे यांनी अध्यक्षीय मनोगतातून शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योगा चे दैनंदिन जीवनातील महत्व विशद करून, योग ही भारतीय प्राचीन विद्यांपैकी असलेली बहुमोल अशी विद्या असल्याचे प्रतिपादन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. जी. जाधव, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी.ए. पवार, सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. लहानु जाधव व महिला तक्रार निवारण समिती समन्वयक डॉ. मीना पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हिरे महिला महाविद्यालयात निरामय आरोग्यावर तपासणी शिबिर संपन्न




**मालेगाव ।** महात्मा गांधी विदयामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला,विज्ञान व वाणिज्य महिला महाविदयालयात ११ डिसेंबर २०२१ रोजी क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे आरोग्य तपासणी व निरामय जीवन शिबीर संपन्न झाले. फिटनेस टीमचे सदस्य मा. कादंबरी शिंदे, मा. पूजा जगताप तसेच मा. रोशनी नरे यांनी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली. मा. पूजा जगताप यांनी विद्यार्थीनीना केल्या जाणाऱ्या तपासणीची सखोल माहिती दिली. शारीरिक, मानसिक, सामाजिक, आध्यात्मिक व आर्थिक-भावनिक आरोग्य हे परस्परांवर अवलंबून असते. समन्वयातून, सकारात्मक संतुलित विचारप्रणालीतून जे आरोग्य आहे, तेच निरामय जीवन आहे असे त्या म्हणाल्या.आरोग्य हीच खरी संपत्ती आहे,कारण शरीर निरोगी असेल तरच तुम्हाला जीवनाचा आनंद लुटता येतो.मात्र आजकालच्या धकाधकीच्या जीवनात आपण आपल्या आरोग्याकडे नकळत दुर्लक्ष करतो ज्यामुळे अनेक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते.जर वेळीच योग्य ती दक्षता घेतली व प्रतिबंधात्मक उपाययोजना केली तर अनेक विकार सहज टाळता येऊ शकतात.त्यासाठी काही चाचण्या जरुर करून घ्याव्यात.आरोग्य तपासणीमध्ये वजन, उंची, पर्सेंट बॉडी फॅट ,पर्सेंट बॉडीमास इंडेक्स, मसल्स मास , विजरल फॅट तसेच इतर महत्वपूर्ण तपासण्या केल्या. शरीराच्या बेसल मेटॅबॉलिक रेटवर वजन घटणं किंवा कमी होणं अवलंबून असते. व्यक्तीपरत्वे प्रत्येकाचा हा मेटॅबॉलिक रेट वेगवेगळा असतो. काहिंचा नैसर्गिकरित्या हा रेट उत्तम असतो.

महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. [illegible] जाधव व शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी. ए. पवार यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालक डॉ. लहानू जाधव व आभार प्रदर्शन प्रा. दीपाली चंद्रमोरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी डॉ. योगिता पाटील, प्रा. शितल साळुंके व महाविद्यालयातील इतर प्राध्यापिका उपस्थित होत्या. शिबीरामध्ये एकूण ७० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

आजचा दिनकर
**वाचकांना विनम्र सूचना**
'दै.आजचा दिनकर' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुरची शहनिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जे दावे करतात त्याची **'दै आजचा दिनकर'** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'दै. आजचा दिनकर' वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व

दिव्य मराठी
नाशिक' जिल्हा पुलआउट 20-10-2021

# मालेगावी हिरे महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींना पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण

**प्रतिनिधी** | मालेगाव

येथील महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे गुणवत्ता सिद्धता मूल्यांकन कक्ष व क्रीडा विभाग आयोजित सात दिवसीय पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेच आयोजन केले आहे.

पोलिस क्षेत्राकडे असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी सात दिवसीय पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा झाली. शाळेची रूपरेषा पोलिस क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीद्वारे तयार करण्यात आली. या आभासी प्रशिक्षण कार्यशाळेला उद्‌घाटक म्हणून सिडको ब्रांच, औरंगाबादच्या श्रद्धा वायदंडे सहभागी झाल्या होत्या. उद्‌घाटनप्रसंगी वायदंडे यांनी पोलिस खात्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच या खात्यावर व वर्दीवर विश्वास असेल तरच आपण या क्षेत्राला व समाजातील अडचणींना योग्यतेने न्याय देऊ शकतो. विद्यार्थिनींनी केवळ नोकरी म्हणून पोलीस खाते स्वीकारणे हे योग्य नसून समाजातील अडीअडचणींना सोडविण्यातच जीवनाची खरी परीक्षा आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे ह्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, विद्यार्थिनींनी पोलिस क्षेत्र निवडताना सामाजिक बांधिलकीचे सातत्याने भान ठेवावे. या क्षेत्रात बऱ्याच वेळा आपल्या भावना बाजूला ठेवून निडरपणे नेतृत्व करणे गरजेचे असते. विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करतानाच या प्रशिक्षणाचा फायदा केवळ महिला महाविद्यालयापुरताच न राहता मालेगाव शहर व ग्रामीण भागातील सर्व महाविद्यालय स्तरावरील विद्यार्थ्यांना व्हावा असा मानसदेखील त्यांनी व्यक्त केला.

या पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ. डी. जी. जाधव, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी. ए. पवार, गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक डॉ. दीपांजली बोरसे व क्रीडा संचालिका डॉ. लहानू जाधव यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन डॉ. जयमाला सोदे यांनी तर डॉ. मीना पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

पुढारी

# कर्तव्य बजावण्यात खरी कसोटी : वायदंडे

## एसपीएच महाविद्यालयात पोलिस भरतीपूर्व कार्यशाळेचे उद्घाटन

**मालेगाव : पुढारी वृत्तसेवा**

पोलिस खात्याच्या माध्यमातून समाजाला न्याय देता येतो. परंतु, केवळ नोकरी म्हणून पोलिस खाते स्वीकारणे हे योग्य नसून कर्तव्य बजावण्यात जीवनाची खरी परीक्षा असते, असे प्रतिपादन औरंगाबादच्या सहायक पोलिस निरीक्षक श्रद्धा वायदंडे यांनी केले.

येथील श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाचा गुणवत्ता सिद्धता मूल्यांकन कक्ष व क्रीडा विभागातर्फे सात दिवसीय पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यशाळेचे नुकतेच उद्घाटन झाले. तेव्हा वायदंडे यांनी पोलिस विभागाविषयी ऑनलाइन मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे यांनी अध्यक्षीय मनोगतात, विद्यार्थिनींनी पोलिस क्षेत्र निवडताना सामाजिक बांधिलकीचे भान ठेवावे. या क्षेत्रात बहुतांश वेळा भावना बाजूला ठेवून निडरपणे नेतृत्व करणे गरजेचे असते, असे सांगितले. या प्रशिक्षणाचा फायदा केवळ महिला महाविद्यालयापुरताच मर्यादित न राहता शहर व ग्रामीण भागातील सर्व महाविद्यालय स्तरावरील विद्यार्थ्यांना व्हावा, असा मानसदेखील त्यांनी व्यक्त केला. कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ. डी. जी. जाधव, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी. ए. पवार, गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक डॉ. दीपांजली बोरसे व क्रीडा संचालिका डॉ. लहानू जाधव हे परिश्रम घेत आहेत. मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयमाला सोदे यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. मीना पाटील यांनी आभार मानले.

### तयारी ते परीक्षा

कार्यशाळेत नाशिकच्या प्रा. मनीष बोरस्ते व त्यांचे सहायक पोलिस भरतीसाठी आवश्यक असलेले नियोजन, अभ्यासक्रम, लेखी परीक्षा, मैदानी स्पर्धा परीक्षा, शासकीय नियम, पूर्वतयारी अशा विविध विषयांवर तंत्रशुद्ध मार्गदर्शन करणार आहेत. पोलिस भरतीसाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनादेखील सहभागी करून घेण्यात येत आहे.

Edition
Oct 13, 2021 Page No.
newspaper.pudhari.co.in

# पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात महायोग महिला प्रबोधिनी आरोग्य शिबिराचे आयोजन



**मालेगांव ।**

महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात महायोग साजरा करण्यात आला.

योगा खरंतर प्रत्येकाच्या आयुष्यात खूप महत्त्वाचा आहे. हा केवळ एक व्यायामाचा प्रकार नाही तर, सध्याच्या धावपळीच्या जीवनात आपण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहोत. यायामाचे, योगाचे आपल्या आयुष्यात खूपच महत्त्व आहे. रोज योगा केल्याने ताणतणावापासून दूर राहता येते. इतकेच नाही तर माणसाचे वजन, हाडं, मांसपेशी आणि सांधेदेखील दणकट राहतात. योगामुळे शरीराम ध्ये ऊर्जा निर्माण होते. शिवाय नियमित योगा केल्याने कोणत्याही आजारापासून दूर राहता येते. योगामुळे रक्तदाबदेखील नियंत्रणात राहातो. त्यामुळे योगा हा बऱ्याचशा आजारांना दूर ठेवतो.

या शिबिरामध्ये योग विद्या धाम येथील योगा प्रशिक्षक मेधा सूर्यवंशी यांनी कार्यालय योगा म्हणजेच कार्यालयात किंवा कामाच्या ठिकाणी बैठक स्थितीत करण्यात येणाऱ्या योगासनांची प्रात्यक्षिके उपस्थितांकडून करून घेतली. या महायोग महिला प्रबोधिनी कार्यक्रम ाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.उज्वला देवरे यांनी आरोग्य, व्यायाम व आहाराचे महत्व पटवून देताना स्वानुभव कथन केले. याम ध्ये एरोबिक्स व्यायाम, चालणे व योगाद्वारे शारीरिक हालचाली मुळे त्यांना प्राप्त झालेले फायदे सर्वांना सांगून योगाचे महत्त्व पटवून दिले.या महायोग महिला प्रबोधिनी शिबिराचे आयोजन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. लहानू जाधव शारीरिक शिक्षण संचालिका यांच्यामार्फत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जितेंद्र पगार यांनी व प्रस्तावना आणि पाहुण्यांचा परिचय क्रीडा संचालिका डॉ.लहानू जाधव यांनी करून दिला तर आभार संगीत विभाग प्रमुख तथा जनसंपर्क अधिकारी प्रा.अशोक जाधव यांनी मानले. तसेच या कार्यक्रमाचे तंत्र सहाय्यक म्हणून डॉ तेजस्विनी सोनटक्के यांनी सहकार्य केले.या कार्यक्रमामध्ये सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

सकाळ



मालेगाव कॅम्प : पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करताना सोनाली पुरोहित व जिमखाना विद्यार्थिनी.

## हिरे महिला महाविद्यालयात युवतींकडून शिवजयंती

मालेगाव कॅम्प : येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती बुधवारी (ता. १९) झाली. जिमखाना प्रतिनिधी सोनाली पुरोहित हिने प्रतिमापूजन केले. या वेळी प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य दिलीप पवार, देवराम जाधव उपस्थित होते.जिमखाना विभागप्रमुख क्रीडा संचालिका डॉ. लहानू जाधव यांनी शिवजयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबविले. यामध्ये शिवाजी महाराज, जिजाऊ, पारंपरिक वेशभूषेत आलेल्या सर्व विद्यार्थिनी यांनी जिमखाना विभागाकडे ढोल पथक व लेझीम पथकाच्या साथीने वाजत-गाजत मिरवणुकीने प्रयाण केले. महाविद्यालयाची राजश्री देवरे या विद्यार्थिनीने छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा परिधान करून महाराजांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला. सविता जाधव व दीक्षा देशमुख यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर व्याख्यान दिले. अश्विनी शिल्लक हिने कविता सादर केली. डॉ. देवरे म्हणाल्या, की जिजाऊ पात्र होण्यासाठी विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. विजया गावित हिने सूत्रसंचालन केले. हॉकीपटू रेणुका मोरे हिने आभार मानले.

Nashik, Malegaon
20/02/2020 Page No. 3



# महिला महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण

▸▸ मालेगाव । दि. १५ प्रतिनिधी

येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात गुणवत्ता सिद्धता मूल्यांकन कक्ष व क्रीडा विभाग आयोजित सात दिवसीय पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेचे नुकतीच संपन्न झाली.

म. गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपुर्व हिरे, संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून महाविद्यालयातील पोलीस क्षेत्राकडे कल असलेल्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी सात दिवसीय पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेची रूपरेषा पोलीस क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीद्वारे तयार करण्यात आली. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन औरंगाबाद येथील महिला पोलीस अधिकारी श्रद्धा वायदंडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्या डॉ. उज्वला देवरे कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी मार्गदर्शन करतांना वायदंडे यांनी विद्यार्थीनींना पोलीस विभागाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या खात्यावर व वर्दीवर विश्वास असेल तरच आपण या क्षेत्राला व समाजातील अडचणींना योग्यतेने न्याय देऊ शकतो. विद्यार्थिनींनी केवळ नोकरी म्हणून पोलीस खाते स्वीकारणे हे योग्य नसून समाजातील अडीअडचणींना सोडविण्यातच जीवनाची खरी परीक्षा असल्याचे त्यांनी शेवटी बोलतांना सांगितले. अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ. देवरे यांनी विद्यार्थिनींनी पोलीस क्षेत्र निवडताना सामाजिक बांधिलकीचे सातत्याने भान ठेवावे. या क्षेत्रात बऱ्याचवेळा आपल्या भावना बाजूला ठेवून निडरपणे नेतृत्व करणे गरजेचे असते. विविध मुद्यांवर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करतांनाच या प्रशिक्षणाचा फायदा केवळ महिला महाविद्यालयापुरताच न राहता मालेगाव शहर व ग्रामीण भागातील सर्व महाविद्यालय स्तरावरील विद्यार्थ्यांना व्हावा असा मानसदेखील त्यांनी व्यक्त केला. या पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ. डी.जी. जाधव, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. डी.ए. पवार, गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक डॉ. दीपांजली बोरसे व क्रीडा संचालिका डॉ. लहानू जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

या सात दिवशीय कार्यशाळेस नाशिक येथील अश्वमेध करिअर अकादमीचे संचालक प्रा. मनीष बोरस्ते व त्यांचे सहाय्यक पोलीस

# Photo Gallery






Welcome - To All Guest, Cycling Players,
Team Manager
Selection Committee Members & Coaches


SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY & BOARD OF SPORTS & PHYSIC
Organised
INTER - ZONAL CYCLING CHAMPIONSHIP (MEN
Welcome - To All Guest, Cycling Players,
Team Manager
Selection Committee Members & Coache


















REDMI NOTE 10 PRO
28/08/2022 17:52






Savitribai Phule Pune University
Nashik District Zonal Sports Committee
GPS Map Camera
Malegaon, Maharashtra, India
HG56+9V2, Gilankar Nagar, Soygaon, Malegaon, Maharashtra 423105, India
Lat 20.558387°
Long 74.512088°
24/02/22 11:07 AM
Nigeria
Google


Savitribai Phule Pune University
Nashik District Zonal Sports Committee
GPS Map Camera
Malegaon, Maharashtra, India
HG56+9V2, Gilankar Nagar, Soygaon, Malegaon, Maharashtra 423105, India
Lat 20.558387°
Long 74.512088°
24/02/22 11:06 AM
Nigeria
Google


Savitribai Phule Pune University
Nashik District Zonal Sports Committee
GPS Map Camera
Nigeria
Google
Malegaon, Maharashtra, India
HG56+9V2, Gilankar Nagar, Soygaon, Malegaon, Maharashtra 423105, India
Lat 20.558387°
Long 74.512088°
24/02/22 10:56 AM






3
1
2




Savitribai Phule Pune University
Nashik District Zonal Sports Committee




अहमदनगर जिल्हा हौशी योग संघ, श्रीरामपूर


नाशिक विभागीय आंतरमहाविद्यालयीन
वेटलिफ्टींग, पॉवर लिफ्टींग व बॉडी बिल्डींग स्पर्धा
उपस्थित सर्व मान्यवरांचे


जळगांव जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन
२६ वी महाराष्ट्र राज्य महिला सॉफ्टबॉल
अजिंक्यपद

